4 MAR 2018 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घरच्यांचा पाठिंबा हेच मोठं बळ

## श्रेयस तळपदे; फिझिंगा-संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा'ला प्रारंभ



कोल्हापूर : 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमात शनिवारी संवाद साधताना अभिनेता श्रेयस तळपदे.

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : घरच्यांचा पाठिंबा हे मोठं बळ असतं. पोरांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी किमान एक चान्स तरी दिलाच पाहिजे आणि त्याचवेळी या संधीचं सोनं करून पोरांनी पालकांचा विश्वास सार्थ ठरवला पाहिजे, असे मत आज अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक श्रेयस तळपदे यांनी व्यक्त केले.

सुमारे पावणेदोन तासांच्या या संवादात त्यांनी सकारात्मक ऊर्जेची बीजं मनामनांत रोवली. निमित्त होतं, सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' या कार्यक्रमाचं. श्रेयस तळपदे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे दिमाखदार

पान २ वर »

### आजचे संवाद





भारतीय अंध क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री शेखर नाईक आज (रविवारी) सदोदित गतीचे गीत गाण्याची ऊर्जा देणार आहेत. त्याशिवाय रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा मिश्रा सामाजिक, आर्थिक, पर्यावरणाचा नवविचार देणार आहेत. अंधत्व असूनही नाईक यांची आजवरची प्रेरणादायी वाटचाल आणि मिश्रा यांचे ग्रामविकासाचे नवे मॉडेल यानिमित्तानं उलगडणार आहे. प्रत्येक संवादाचे फेसबुकवरून लाईव्ह प्रसारण होणार आहे. हा संवाद अनुभवण्यासाठी लिंक करा-www.facebook.com/kolhapursakal



4 MAR 2018 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घरच्यांचा पाठिंबा हेच मोठं बळ

» पान १ वरून

उद्घाटन झाले आणि या मालिकेतील पहिले पुष्प गुंफताना त्यांनी उपस्थितांशी दिलखुलास संवादही साधला. योगेश देशपांडे यांनी हा संवाद आणखी खुलवला.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार, कार्यकारी संपादक मनोज साळुंखे, उपसरव्यवस्थापक रवींद्र रायकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव, फिझिंगा - संजय घोडावत ग्रुपतर्फे क्लायमॅक्स ॲडव्हर्टाईजचे उदय जोशी, हॉटेल सयाजीचे ऋतुराज पाटील, चाटे शिक्षण समूहाचे संचालक डॉ. भारत खराटे, मार्व्हलस इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेडचे संग्राम पाटील, तनिष्क ज्वेलर्सचे जय कामत आदींच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले.

शाळेतील आठवणींनी श्रेयस तळपदे यांच्याशी संवादाला प्रारंभ झाला. ते म्हणाले, ''शाळेत असताना नाटकाचं वेड फारसं नव्हतं; मात्र, आठवीला असताना एकदा आईने 'करार' या नाटकाला नेलं आणि नाटकाची जादू पाहून प्रेमातच पडलो. शाळेत लघुनाटिकेत सहभागी होऊ लागलो. पहिली भूमिका अगदी अनपेक्षितपणे मिळाली आणि ती होती सीतेची. दुसऱ्या वर्षी मग 'मॉडर्न महाभारत'मध्ये द्रौपदीची भूमिका केली. त्यामुळे आत्मविश्वास वाढत गेला. दहावीनंतर थोरल्या भावाने शिवाजी पार्कमध्ये क्रिकेट प्रशिक्षणाला पाठवले. क्रिकेटही चांगले खेळू लागलो. मात्र, कॉलेजला गेल्यानंतर जाणीवपूर्वक क्रिकेट थांबवून नाटकांवर लक्ष केंद्रित केले.''

नाटक, सीरियलमध्ये छोटी छोटी कामं मिळत होती; पण अपेक्षित कामं मिळत नव्हती. 'आभाळमाया' सीरियलच्या निमित्तानं संधी मिळाली आणि तिचं सोनं केलं. इथूनच मग स्वतंत्र ओळख मिळत गेली. 'इकबाल' चित्रपटातील लीड रोलचा प्रवास तर रंजकच आहे. काय काम आहे हे माहिती नसतानाही ऑडिशन दिली. वारंवार ऑडिशन झाल्या आणि दोन महिन्यांच्या तारखा बुक केल्याचे प्रॉडक्शन हाऊसने सांगितल्यावर एवढ्या छोट्याशा रोलसाठी दोन महिने, असा प्रश्न विचारला. त्यावेळी तो लीड रोल असून दोन महिने शूटिंग चालणार असल्याचे समजले, असेही श्रेयस यांनी सांगितले. 'ओम शांती ओम' आणि शाहरूख खान, 'गोलमाल' आणि अजय देवगण यांच्या मैत्रीचे पदरही त्यांनी उलगडले.

दरम्यान सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. ते म्हणाले, ''बातम्यांपलीकडेही समाजाच्या गरजा ओळखून सकाळ माध्यम समूहाने विविध उपक्रम सुरू केले. खास तरुणाईसाठी 'ऊर्जा' हा उपक्रम असून त्याला मोठा प्रतिसाद मिळतो आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे मोठे सहकार्य आहे.'' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनीही शुभेच्छापर बोलताना अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले.

### प्रायोजकांविषयी...

- सहप्रायोजक : चाटे शिक्षण समूह, मार्व्हलस इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स, श्री ट्रॅव्हल्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी
- रेडिओ पार्टनर : रेडिओ सिटी

### अनुकरणीय उपक्रम

श्रेयस तळपदे यांचं टाळ्या आणि शिट्यांच्या खास कोल्हापुरी स्टाईलमध्ये स्वागत झाले. कोल्हापूरची माणसं इतकी गोड असतात, की 'ब्लॅक कॉफी विदाऊट शुगर' असं सांगितलं तरी ते थोडी का होईना साखर घालतातच. शिवाजी विद्यापीठातील नो व्हेईकल डे, बुकेऐवजी राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र, 'ऊर्जा'सारखा उपक्रम व झाडाला पाणी घालून उद्घाटन या साऱ्या गोष्टी अनुकरणीय असल्याचे त्यांनी सांगितले.

### लग्नाच्या दुसऱ्या दिवशी गाठले हैदराबाद

'इकबाल'च्या शूटिंगचे नियोजन एक जानेवारीपासून होणार होते आणि ३१ डिसेंबरला लग्न होते. लग्न आटोपून पत्नीसह दुसऱ्या दिवशी हैदराबाद गाठले. वीस दिवस प्रॅक्टिस सुरू होती आणि दररोज झपाटून काम करीत होतो. रात्री घरी परतल्यावर ताप यायचा. पत्नी गोळ्या द्यायची आणि रात्रभर डोक्यावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवायची. तिचा मोठा आधार होता म्हणूनच त्यावेळी टिकलो आणि आजही पाय घट्ट रोवून उभे असल्याचे श्रेयस तळपदे यांनी सांगितले.

### शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य

'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाला गेली चार वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले आहे.

विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दररोज सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत मुलाखती होतील. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था केली आहे. कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून, मोफत सन्मानिकाही उपलब्ध आहेत.

### श्रेयस सक्सेस मंत्राज्

- काम छोटे असो किंवा मोठे ते प्रामाणिकपणे करा. कामाशी प्रतारणा नकोच.
- शिक्षण संपते; तेव्हा माणूस संपतो. मनातील लहान मूल जिवंत ठेवा. शिकत शिकत मोठे होत राहाल.
- अभिनेत्याचे सकाळी डोळे उघडतात; तेव्हापासून रियाज सुरू होतो. तो रात्री झोपतो, तेव्हाच रियाज संपतो.
- चित्रपट क्षेत्रात येण्यापूर्वी रंगभूमी मस्टच. हे 'फाऊंडेशन' मजबूत करा. पुढे कसलीच अडचण येणार नाही.
- सिनेमा म्हणजे केवळ ॲक्टिंग नव्हे. एक सिनेमा बनताना तब्बल साडेतीनशे जॉब उपलब्ध असतात. भरपूर संधी आहेत त्यांचं सोनं करा.
- रोज सात ते आठ तास झोप, संतुलित आहार व नियमित व्यायाम आवश्यकच.

सकाळ माध्यम समूह व शिवाजी विद्यापीठ
यांच्या संयुक्त विद्यमाने

सकाळ
उदय भविष्यपत्राचा

Fizzinga
SANJAY GHODAWAT GROUP

साम

YOUNG INSPIRATORS NETWORK

प्रस्तुत

# संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा 2018

## दि. ४ ते ६ मार्च २०१८

वेळ: सायं. ६ ते ८
स्थळ : लोककला केंद्र,
शिवाजी विद्यापीठ
(पदवीदान सभागृह), कोल्हापूर.

ज्यांचे जीवन, विचार, कार्य प्रेरक आहेत.. अशा यशस्वी ध्येयवेड्यांना भेटण्याची संधी!



### आज ४ मार्च

## पद्मश्री शेखर नाईक

भारतीय अंध क्रिकेट संघाचे माजी कप्तान

अंधत्व असूनही जगण्याकडे डोळसपणाने पाहणारा नव्या दृष्टीचा युवक. भारतीय अंध क्रीकेट संघाचे माजी कप्तान. शालेय जीवनापासून खेळाची आवड. क्रीकेट या खेळावर लक्ष केंद्रीत करुन विभागीय क्रीकेट स्पर्धांतून राष्ट्रीय संघाचा कप्तान हा त्यांचा प्रवास. जिद्द, प्रयत्नवाद आणि सकारात्मक दृष्टीचेच प्रतिक.

### आज ४ मार्च

## नीलीमा मिश्रा

मॅगसेसे पुरस्कार विजेत्या

ग्रामविकासाचं नवं मॉडेल प्रस्थापित करणारी 'मॅगसेसे पुरस्कार' प्राप्त महिला. बहादरपूर (जळगांव) या गावाचा कायापालट करताना सामाजिक, आर्थिक, पर्यावरणाचा विचार महत्त्वाचा मानणारी ही समर्पित कार्यकर्ती.



मुलाखतकार : योगेश देशपांडे, पुणे

Co Sponsor

Chate — The Symbol Of Merit | MARVELOUS ENGINEERS PVT. LTD | TANISHQ | ASHOKRAO MANE GROUP OF INSTITUTIONS | श्री ट्रॅव्हल्स

Hospitality Partner — SAYAJI Yours. Truly.

Radio Partner — RAG RAG MEIN KOLHAPUR CITY. 95 FM Radio City

प्रवेश विनामुल्य

4 MAR 2018 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity to conduct mock test for smooth SRPD

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) is going to conduct mock test of officials associated with the Secured Remote Paper Delivery (SRPD). The mock test will be conducted a few days before the examination begins.

The summer semester examination is set to commence from March 22, across Sangli, Satara and Kolhapur districts.

According to officials, since the subjects under the SRPD have been expanded, it is essential to make sure staff associated with the activity remains flawless in their functioning.

The university is expanding its scope of SRPD to courses such as BSc, BA, BBA, BCA and BVoc from pharmacy and engineering. Workshops for people associated with the exam were conducted earlier last month. They know how the system functions.

Under the SRPD, the respective exam centres has to download the question paper and make sure the step is completed properly.

Director of board of examinations and evaluation in SUK Mahesh Kakade said that under the system, the examination department sends the papers directly to the examination centres in an encrypted format online. Nobody can decrypt the online copy of the paper. At the examination centre too, the authorities are given two one-time passwords, one to decrypt the document and the other to download the copy.

According to Kakade, at present SRPD is being used for a few undergraduate engineering and pharmacy courses along with management courses at colleges in Sangli, Satara and Kolhapur districts.

It may be noted that the examination department had implemented the SRPD system for engineering in October 2012 in an experimental capacity. The experiment was successful and the system was further extended to pharmacy in March 2013. It is being expanded ever since every semester with the addition of new courses to the system.

## Granth Mahotsav at Shivaji University

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will organise a 'granth mahotsav' (book festival) from March 18 to 20 on the university campus.

The dates for the fair are tentative as the final call will be taken once the date for university's convocation ceremony are finalised.

The university officials said 50 book stalls will be set up at the fair.

The event has been organised keeping in mind the 54th convocation ceremony at the university campus. Over 50,000 visitors, including students, are likely to be on the campus. The three-day book festival will see participation of publishers from all over the region.



Last year the event had hosted over 50 stalls set up by publishers. The books on offer included competitive topics, social, intellectual and other literary works of various authors. Many of the publishers had offered a discount of 20-30% at the event.

SUK officials said that they are hoping for a better response for the Teachers Personal Library Scheme (TPLS) during the event.

The TPLS scheme offers 50% discount to teaching as well as non-teaching faculties on purchase of books. Under the scheme along with teachers, officers from class one, two and three of the university and affiliated colleges, are allowed 50% grant on the purchase of books.

The 25-year-old scheme according to university officials is valid twice a year, where a teacher or the officer has to submit an application form for the grant. However response to the scheme has been low. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAR 2018
पुढारी

# प्रदीप लोखंडे यांचे उद्या शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करियर गाईडन्स अँड सायकॉलॉजीकल कौन्सिलिंग यांच्यावतीने सोमवारी (दि.५) सकाळी अकरा वाजता पुणे येथील रूरल रिलेशन्स या एनजीओचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांचे व्याख्यान होणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होईल. या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. जी. एस. पाटील व विद्यार्थी मंडळ विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAR 2018
तरुण भारत

# विद्यापीठात उद्या प्रदीप लोखंडे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर करियर गाईडन्स अँड सायकॉलॉजीकल काऊन्सेलिंग यांच्या वतीने सोमवार ५ रोजी पुणे येथील रुरल रिलेशन्स या एनजीओचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानाचा विषय 'चेंजींग रुरल इंडीया करिअर ऑपरॉच्युनिटीज् फॉर स्टुडंटस् ऑफ हायर एज्युकेशन' हा असणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAR 2018
सकाळ

# प्रदीप लोखंडे यांचे उद्या व्याख्यान

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठात सोमवारी (ता. ५) सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृहात पुणे येथील रूरल रिलेशन्स या एनजीओचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांचे व्याख्यान होणार आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. जी. एस. पाटील व विद्यार्थी मंडळ विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू
24 MAR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून शॉर्ट टर्म प्रोग्रामचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे कै. आर. एन. गोडबोले अध्यासनाच्या वतीने व युजीसी - एच आर डी सेंटर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने सात दिवसांचा शॉर्ट टर्म प्रोग्राम दि.६ ते १२ मार्च या कालावधीत आयोजित केला आहे. या शॉर्ट टर्म प्रोग्रामचे उद्घाटन मंगळवारी (दि. ६) सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये मान्यवरांच्या उपस्थित होणार आहे. यावेळी सारस्वत बँकेचे संचालक पी. एन. जोशी प्रमुख पाहुणे असणार आहेत. तर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे असणार आहेत. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAR 2018
सकाळ

# प्रदीप लोखंडे यांचे उद्या व्याख्यान

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठात सोमवारी (ता. ५) सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृहात पुणे येथील रूरल रिलेशन्स या एनजीओचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप लोखंडे यांचे व्याख्यान होणार आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. जी. एस. पाटील व विद्यार्थी मंडळ विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठात बुधवारपासून दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने 'डॉ. आंबेडकर आणि त्यांचे समकालीन' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे उद्‍घाटन ६ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित असतील. ७ मार्च रोजी चर्चासत्राचा समारोप होईल. दोन दिवसीय चर्चासत्रात मान्यवर अभ्यासकांचे मार्गदर्शन व पेपर प्रेझेंटेशन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 MAR 2018
तरुण भारत

# प्रा. डॉ. के. टी. जाधव यांची निवड

**कसबा बावडा :** शिवाजी विद्यापीठाच्या नुकत्याच



जाहीर झालेल्या मान्यताप्राप्त संस्था व महाविद्यालय तपासणी समितीवर डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी कसबा बावडा, कोल्हापूर ये-थील डॉ. के. टी. जाधव यांची बिनविरोध निवड झाली. सध्या सत्ताधारी असणाऱ्या विद्यापीठ विकास आघाडीच्या तर्फे ही निवड बिनविरोध करण्यात आली. विद्यापीठाच्या सोमवारी झालेल्या पहिल्या सिनेट सदस्य बैठकीत या निवडीवर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. डॉ. जाधव हे सध्या कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये के-मकल विभागप्रमुख म्हणून १८ वर्षांहून जास्त काळ कार्यरत आहेत. त्याचबरोबर ते महाविद्यालयाच्या गर्व्हनिंग कौन्सिलवर तसेच एन.बी.ए. समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. या निवडीसाठी डी. वाय. पाटील संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील तसेच विकास आघाडीच्या सर्व सदस्यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. ए. एन. जाधव, अनिल पाटील यांचे सहकार्य मिळाले.

# महिलांचे स्थान महत्त्वाचे : पांडव

जयसिंगपूर : जीवनामध्ये महिलांचे स्थान महत्त्वाचे आहे. महिलांमुळेच आदर्श कुटुंबे घडत असतात, असे प्रतिपादन डॉ. पी. एस. पांडव यांनी केले. येथील कन्या महाविद्यालयात आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. जे. फगरे होते. यावेळी गौतम ढाले, यु. ए. पाटील यांच्यासह शिक्षक, विद्यार्थिनी उपस्थित होते. डॉ. उदगावकर यांनी आभार मानले.